एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
ध्यास पत्रकारितेचा...
विश्वास वाचकांचा...
प्रवास पाच पिढ्यांचा!
'नवाकाळ' चे १०४ व्या वर्षात पदार्पण...
R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 1 Marathi - Daily - Mumbai, 7 March, 2026 Page- 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in • मुंबई, शनिवार ७ मार्च, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१, पाने-८, किंमत: ₹ ७

पोटशुद्धीसाठी उपाय शोधून थकलात?
वैद्य पाटणकर आयुर्वेदिक काढा
'कडवट'.. पण पोटशुद्धीची खात्री..
१००% आयुर्वेदिक रक्तशोधक

पोटशुद्धी, मुळव्याध, ॲसिडीटी, पित्त, अंगास खाज, शरीरातील उष्णता, पिंपल्स यांवर गुणकारी.
वैद्य पाटणकर फार्मसी प्रा.लि.
Mob. : 7738768323 / 9324504141

# लाडक्या बहिणींची फसवणूक? २,१०० रुपये मिळणार नाहीत
# शेतकऱ्यांनाही पूर्ण कर्जमाफी नाही! २ लाखांवर बोळवण

■ मुंबई

**शेतकऱ्यांना** पूर्ण कर्जमाफीचा निर्णय सरकारने घेतला नाही. जूनपर्यंत पूर्ण कर्जमाफी जाहीर करू, असे सरकारने वारंवार सांगितले होते. मात्र आज केवळ दोन लाखांपर्यंतचे कर्ज माफ करण्याची घोषणा करण्यात आली.

नाशिकच्या तपोवन भागात कुंभमेळ्यासाठी हजारो झाडे तोडण्यावरून सरकारवर टीका होत असताना त्यावर मलम लावण्यासाठी आज सरकारने ३०० कोटी झाडे लावण्याची योजना जाहीर केली.

लाडकी बहीण योजनेअंतर्गत २,१०० रुपये देण्याचे आश्वासन निवडणुकीवेळी देण्यात आले होते. मात्र अर्थसंकल्पात त्या दृष्टीने कोणतीही तरतूद केलेली नाही. लाडकी बहीण योजना सुरूच राहील, इतकीच घोषणा आज करण्यात आली.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज राज्याचा अर्थसंकल्प सादर केला. यावेळी 'अजितदादा अमर रहे' च्या घोषणा आमदारांनी दिल्या. फडणवीस यांनी आजचा अर्थसंकल्प अजित पवारांना समर्पित केला. ते म्हणाले की, हा अर्थसंकल्प नसून विकसित महाराष्ट्राची वाटचाल आहे. २०४७ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरवर नेण्याचा संकल्प आहे.**



**महान व्यक्तिमत्त्वांच्या - स्मृतीसाठी योजना**

संत गाडगेबाबा तिर्थक्षेत्र विकसित केले जाईल. महात्मा फुलेंच्या कार्याचा गौरव करण्यासाठी समिती स्थापन केली जाईल. डॉ. आंबेडकर यांच्या चवदार तळे शताब्दी निमित्त विकास पान ७ वर

जुने ते सोने
50 वर्षा पासून प्रसिद्ध !
धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
आजच रात्री घ्या, सकाळी OK!
डॉ. अभिजीत 9422011723

## कर्ज काढून फटाके वाजवणारा अर्थसंकल्प

निवडणुकीच्या वेळेला ज्या थापा मारल्या होत्या त्याच्या क्लिप अजूनही माझ्या फोनमध्ये आहे. आम्ही शेतकऱ्यांची कर्जमुक्ती २ लाखांपर्यंत केली होती. एकूणच आजचा अर्थसंकल्प पाहिला तर सातबारा कोरा नाही झाला. कर्ज काढून फटाके फोडल्यासारखे हा अर्थसंकल्प असल्याची टीका उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी केली. ते पुढे म्हणाले की, साधारण पाच वर्षांपूर्वी त्यांच्या सरकारने कालबद्ध पद्धतीने दोन लाख रुपयांपर्यंत शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केली होती. त्यावेळी पात्र-अपात्र अशा अटींचे जंजाळ ठेवले नव्हते. शेतकऱ्याने दोन वेळा केंद्रावर जाऊन नोंदणी केल्यानंतर सरसकट कर्जमाफी देण्यात आली होती. त्यानंतर कोरोना आला. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांची प्रोत्साहनपर रक्कम देण्यास सुरुवात केली होती. मात्र त्याच दरम्यान आमचे सरकार पाडले गेले. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याची घोषणा केली होती. त्याचाही कुठे उल्लेख दिसत नाही. मात्र कंत्राटदारांसाठी ठोस योजना आहेत. कोणत्या प्रकल्पासाठी किती निधी, किती मार्ग आणि किती कोटी खर्च होणार याचे तपशील दिले आहेत. शेतकरी, कामगार आणि सामान्य नागरिकांसाठी हा अर्थसंकल्प फसवा असून, विकासाचे मृगजळ दाखवणारा आहे.



## अनिल अंबानींच्या अडचणीत वाढ
## रिलायन्स पॉवर कार्यालयांवर ईडीचे छापे

■ मुंबई

**उद्योगपती** अनिल अंबानी यांच्या अडचणी पुन्हा एकदा वाढल्या आहेत. मनी लॉंड्रिंग आणि बँक कर्जातील अनियमिततेप्रकरणी कारवाई करत ईडीने आज मुंबई आणि हैदराबाद येथील रिलायन्स पॉवर कंपनीशी संबंधित अनेक ठिकाणी छापेमारी केली.

रिलायन्स पॉवर कंपनीची कार्यालये आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संबंधित सुमारे १० ते १२ ठिकाणी एकाच वेळी झडती घेण्यात आली. या कारवाईसाठी ईडीची सुमारे १५



पथके तैनात करण्यात आली होती. सकाळ होण्यापूर्वीच अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणी पोहोचून तपास सुरू केला. या प्रकरणात ईडीने यापूर्वीही अनिल अंबानी यांना चौकशीसाठी समन्स बजावले होते. २६ फेब्रुवारीला त्यांनी दिल्लीतील ईडी मुख्यालयात उपस्थित राहून तपास अधिकाऱ्यांसमोर आपला जबाब नोंदवला होता. मात्र २७ फेब्रुवारी रोजी ते ईडीसमोर हजर राहिले नव्हते. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर ईडीने या प्रकरणासाठी विशेष तपास पथक स्थापन केले आहे.

## मुंबई महापौरांच्या मतदारसंघात
## मृत्यू नोंदींच्या गुजराती पावत्या

■ मुंबई

**घाटकोपर** येथील हिंदू स्मशानभूमीत मृत्यू नोंदींच्या पावत्या गुजराती भाषेत दिल्या

### मनसे आक्रमक

जात असल्याचा प्रकार उघड झाल्याने मनसे आक्रमक झाली आहे. हा परिसर मुंबईच्या महापौर नीतू तावडे यांच्या मतदारसंघात येत असल्याने हा मुद्दा अधिक चर्चेत आला आहे.

मृत्यू नोंदीसारख्या अधिकृत पावत्या मराठीऐवजी गुजराती भाषेत दिल्या जात असल्याने स्थानिक नागरिकांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी सहाय्यक आयुक्तांना पत्र देत तातडीने योग्य कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणात त्वरित दखल घेऊन कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मनसेकडून देण्यात आला आहे.

## समुद्रात अडकलेल्या रशियन तेलाची खरेदी करा
## भारताला अमेरिकेने ३० दिवसांची मुदत दिली

■ नवी दिल्ली

**समुद्रात** अडकलेल्या रशियन तेलाच्या जहाजांतील तेल खरेदी करायला अमेरिकेने भारताला परवानगी दिली आहे. भारताला ही खरेदी करण्यासाठी अमेरिकेने ३० दिवसांची मुदत दिली आहे. अमेरिकेचे ट्रेझरी सचिव स्कॉट बेसेंट यांनी त्यांच्या एक्स अकाऊन्टवर पोस्टमध्ये ही माहिती दिली आहे.

यावर भारतातून संतप्त प्रतिक्रिया येत आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटले



आहे की, आज आपण जे पाहत आहोत ते परराष्ट्र धोरण नाही. ते एका समझोता केलेल्या व्यक्तीच्या शोषणाचा परिणाम आहे. तर अनेकांनी हे गुलामगिरीचे लक्षण असल्याचे म्हणत पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य केले आहे.

अमेरिकेचे ट्रेझरी सचिव स्कॉट बेसेंट यांनी म्हटले आहे की, अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ऊर्जा धोरणामुळे तेल आणि वायू उत्पादनाने आतापर्यंतची सर्वाधिक उच्च पातळी गाठली आहे. जागतिक बाजारात तेलाचा पुरवठा सुरू राहावा यासाठी पान २ वर

## व्हीएसआर मालकाला व्हीआयपी वागणूक! रोहित पवारांचा आरोप

■ पुणे

**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी चौकशीसाठी बोलावण्यात आलेल्या व्हीएसआर विमान कंपनीच्या मालकाला सीआयडीकडून व्हीआयपी वागणूक दिल्याचा आरोप शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला. रोहित पवार म्हणाले की, व्हीएसआर कंपनीचे मालक व्ही. के. सिंग यांना काल सीआयडीने चौकशीसाठी बोलावले होते की, शाही पाहुणचारासाठी, असा प्रश्न निर्माण झाला आहे. सकाळी ११ वाजता ते सीआयडी कार्यालयात आले आणि त्यांची आठ तास चौकशी झाल्याचे सांगितले जात आहे.

## अग्निवीरांसाठी स्वयंरोजगार संधींच्या अभ्यासासाठी समिती

■ मुंबई

**केंद्र** सरकारच्या अग्निपथ योजनाअंतर्गत चार वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या अग्निवीर जवानांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या अभ्यासगट स्थापन करण्यात आला आहे, अशी माहिती माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराजे देसाई यांनी दिली.

केंद्र सरकारच्या अग्निपथ योजनेअंतर्गत चार वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या जवानांपैकी सुमारे ७५ टक्के जवानांना पुढील काळात कायमस्वरूपी सेवेत संधी मिळत नाही. स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबाबत आमदार हिरामण खोसकर तसेच इतर आमदारांनी तारांकित प्रश्न करत शंभूराजे देसाई यांच्याकडे खुलासा मागितला होता. त्यावर देसाई यांनी लेखी उत्तर दिले. या प्रश्नाला उत्तर देताना शंभूराजे देसाई म्हणाले की, सैन्यदलातून अग्निवीर म्हणून सेवा समाप्त झाल्यानंतर त्यांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी अभ्यासगट गठीत करण्यात आला आहे. या अभ्यासगटाला तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

लिपिड प्रोफाईल, मधुमेह, रक्तदाब
यासाठी पॅथोलोजी लॅबला रक्त चाचणी केली का?
ही लॅब फसवी, बेकायदा तर नाही हे जाणणार कसे?
सोमवार ९ मार्च रोजीच्या नवाकाळ अंकात वाचा
डॉ. संदीप यादव यांची खास मुलाखत
अंक राखून ठेवा

## महादेव मुंडे हत्या प्रकरणात धनंजय मुंडेंना आरोपी करा
### राजाभाऊ फड यांची मागणी

■ बीड

**परळीतील** व्यापारी महादेव मुंडे हत्या प्रकरणावरून राजकीय वातावरण पुन्हा तापले असून, या प्रकरणात परळीचे आमदार धनंजय मुंडे यांना आरोपी करण्यात यावे, अशी मागणी शरद पवार गटाचे नेते राजाभाऊ फड यांनी आज पत्रकार परिषदेत केली. या प्रकरणात २० मार्चपर्यंत कारवाई अन्यथा आंदोलन करू, असा इशारा देखील त्यांनी दिला.

पत्रकार परिषदेत राजाभाऊ फड म्हणाले की, महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास सुरू असताना धनंजय मुंडे यांच्या बंगल्यावरून पोलिसांना फोन गेला होता. त्यानंतर तपासाची प्रक्रिया थांबवण्यात आली. या प्रकरणातील संशयितांवर करण्यात आलेल्या ब्रेन मॅपिंग आणि नार्को टेस्टचे अहवाल तातडीने जाहीर करावेत. महादेव मुंडे हत्या प्रकरणातील खरे सूत्रधार अद्याप अटकेबाहेर आहेत. परळी परिसरात आतापर्यंत घडलेल्या अनेक गंभीर घटनांमध्ये योग्य तपास झाला नाही. धनंजय मुंडे यांनी आजवर परळीतील दहा लोकांना संपवले आहे. त्यांची नावे देखील आमच्याकडे आहेत. महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणाचा तपास योग्य पद्धतीने झाला असता तर बापू आंधळे व संतोष देशमुख हत्या प्रकरण घडलेच नसते.

## इराण-इस्त्रायल तणावादरम्यान किम जोंग-उन यांचे मीम्स व्हायरल

**इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढत असताना सोशल मीडियावर उत्तर कोरियाचे नेते किम जोंग-उन यांचे अनेक मीम्स मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. व्हायरल होत असलेल्या एका व्हिडिओमध्ये किम जोंग-उन टेकडीवर उभे राहून दूरवर पाहताना दिसतात. या व्हिडिओला ब्रो सफरिंग फॉर पीस असे कॅप्शन देण्यात आले आहे.**




■ मुंबई

**याशिवाय** काही मीम्समध्ये किम जोंग-उन दुर्बिणीतून परिस्थिती पाहताना किंवा स्क्रीनसमोर बसून परिस्थितीवर लक्ष ठेवताना दाखवले आहेत. तर जेव्हा तुमच्याकडे सर्वोत्तम खेळणी असतात पण कोणीही तुम्हाला खेळ खेळण्यासाठी आमंत्रित करत नाही, कोणीच मदत स्वीकारत नाही अशा आशयाचेही काही मीम्स व्हायरल होत असून, नेटकरी त्यावर विविध प्रतिक्रिया देत आहेत. दरम्यान, किम जोंग-उन यांनी इराणच्या बाजूने भूमिका घेत गरज पडल्यास मदत करण्याची तयारी दर्शवली असल्याची चर्चा आहे. मात्र इराणने अद्याप ती मदत स्वीकारलेली नसल्याचे सांगितले जात आहे.




सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## इकबाल मिर्चीच्या ७०० कोटींच्या मालमत्तांवर ईडीची कारवाई! ३ वरळीत तर १५ दुबईत

■ मुंबई

**गँगस्टर** इक्बाल मेमन उर्फ इक्बाल मिर्ची आणि त्याच्या कुटुंबीयांशी संबंधित १८ मालमत्ता जप्त करण्याची मागणी ईडीने फरार आर्थिक गुन्हेगार कायदा (एफईओ) अंतर्गत केली. ईडीने जप्तीसाठी वरळीतील तीन मालमत्ता सूचीबद्ध केल्या असून, त्यात सी व्ह्यू, मॅरियम लॉज आणि राबिया मॅन्शन या मालमत्तांचा समावेश आहे. या मालमत्तांची किंमत सुमारे ४९७ कोटी असल्याचे सांगितले जात आहे. दुबईतील त्याच्या १५ मालमत्ता जप्त करण्याचीही मागणी ईडीने केली असून, सर्व मालमत्तांची एकूण किंमत सुमारे ७०० कोटी रुपये आहे. लंडनला पळून गेलेल्या इक्बाल मिर्चीचा मृत्यू झाला आहे. मात्र त्याच्या मालमत्तेचे लाभार्थी असलेले पत्नी हाजरा मेमन आणि मुलगे आसिफ मेमन व जुनैद मेमन यांना फेब्रुवारी २०२१ मध्ये विशेष न्यायालयाने फरार आर्थिक गुन्हेगार घोषित केले होते. त्यानंतर या मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली. यावर्षी जानेवारीमध्ये ईडीने विशेष न्यायालयात आसिफ मेमनशी संबंधित १८ मालमत्तांची अतिरिक्त यादी सादर केली असून त्या जप्त करण्याची मागणी केली आहे.

## यूपीएससी निकाल अनुज अग्निहोत्री प्रथम

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** लोकसेवा आयोगाकडून (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षा २०२५ चा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला असून, राजस्थानमधील कोटा येथील अनुज अग्निहोत्री यांनी देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. यंदाच्या निकालात अनुज अग्निहोत्री यांनी अखिल भारतीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला. दुसऱ्या क्रमांकावर राजेश्वरी सुवे एम, तिसऱ्या क्रमांकावर आकांश धुल्ल, चौथ्या क्रमांकावर राघव झुनझुनवाला आणि पाचव्या क्रमांकावर ईशान भटनागर यांनी स्थान मिळवले आहे.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

पाहिजे हॉस्पिटलसाठी लेडीज गोरेगाव मावशी / हाऊसकिपिंग जेन्ट्स सिक्युरिटी गार्ड-राममंदिर, अंधेरी, तुर्भे- **8097507698** {NC254351}

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार+जेवण+निवास मोफत) घरकूल केअर सेंटर : **9819426634 / 9969529162** {NC254380}

लोअर परेल चिंचपोकळी येथे ई-बाईक वजा डिलेव्हरीसाठी तरुण पाहिजेत. पगार 14,000+ रविवार सुट्टी, 9 ते 7 संपर्कः **9320064643** किंवा व्हॉट्सअप नंबर **8080084843** वर HI पाठवा. {NC254402}

शाळेच्या बससाठी वैध लायसन्स, बॅच असलेले ड्रायव्हर्स पाहिजेत. ड्युटी सकाळी 6.30 ते संध्याकाळी 5.00 सुरुवातीचा पगार 22,000/ आणि काम मलबार हिल आणि चर्चगेट फाऊंटन एरिया येथे बस पार्किंग लोढा पार्किंग परेल येथे संपर्क. सकाळी 9.00 ते संध्याकाळी 6.00 **9930176861 / 9324870882** {NC254407}

इमिटेशन कंपनीमध्ये कामासाठी मुली पाहिजेत. वय पस्तीसपर्यंत. मालाड पूर्व, स्टेशनजवळ- **9819999006** {NC254056}

ड्रायव्हर पाहिजे पगार 30,000 + OT कमीत कमी 5 वर्षाचा अनुभव, आर्यन इन्फोकॉम शॉप नं. ५ सहयोग बिल्डिंग एल.जे.रोड, सिटीलाईट सिनेमा शेजारी माटुंगा पश्चिम. संपर्कः- **8291255645** {NC254414}

अंधेरी पूर्व येथे अनुभवी लॅमिनेशन ऑपरेटर, कोमोरी, फिडरमॅन बॉयलर पाहिजेत. संपर्कः- **9653405531** {NC254410}

## पाहिजेत

अनुभवी PVC welder चेंबूरस्थित फॅक्टरीला त्वरित पाहिजे Tarpaulin welding येणे आवश्यक संपर्कः **7977316601** {NC254356}

P Square Pest Control मध्ये मुले/ मुली पाहिजेत. दादर **9820548338** {NC254316}

सरकारमान्य कंपनीत निवृत्त अधिकारी / टीचर / गृहिणी पाहिजेत. (पगार+पीएफ). **9670731420** {NC254359}

मालाड (ईस्ट) मध्ये हेल्पर कम डिलीवरी बॉईज पाहिजे. **9892106609** {NC254385}

ॲल्युमिनियम विंडो कॅनोपी, कायडींग, रुफिंग, फॅब्रिकेटरचे काम करणारे कॉन्ट्रॅक्टर कारागिर व हेल्पर अर्जंट पाहिजेत. उत्तम वेतन. संपर्क **9324804795** {NC254384}

ऑफिसच्या कामासाठी टॅली ऑपरेटर, स्क्रीन-प्रिंटर, हेल्प डिलिव्हरीबॉय आवश्यकता आहे. नेपच्यून प्रिंटर्स गाला क्रमांक-५६/बी, मुस्तफा बाजार, गेट क्रमांक-१, लेन-१, संत सावता मार्ग, भायखळा (पूर्व) आणि रे रोड स्टेशन दरम्यान, मुंबई- **9869081515** {NC254320}

हाऊसकिपिंगसाठी बापली बंगलो साईबाबानगर बोरिवली वेस्टमध्ये लेडीस/ जेन्टस 9-6 pm, अनुभवी प्राधान्य. **9821112796** {NC254328}

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकिंगसाठी मुले व मुली पाहिजेत. जय गणेश मेटलप्रिंट, गाळा नंबर-६, बबन मिश्रा कंपाऊंड, सोनावाला क्रॉस रोड नंबर-२, गोरेगांव (पूर्व)- **9820382105 / 8879772701** {NC254392}

## पाहिजेत

दुपट्टा कंपनीसाठी चेकिंग, पॅकिंग व हेल्पर कामासाठी मुले व मुली त्वरित पाहिजेत. पत्ताः भेटा गाला नं. 11, खेतानी इंडस्ट्रियल इस्टेट, 106/7 बाजार वॉर्ड, सोनापूर लेन, कुर्ला वेस्ट, मुंबई- 400070 (आगाशे हॉस्पिटलच्या मागे) {NC254313}

अंधेरी वेस्टमध्ये लेधर बेल्ट कंपनीसाठी लेबर वर्कर पाहिजे. संपर्क : **9820871004** {NC254400}

**ठाण्यातील लेडीज शोरूमसाठी**
**सेल्स गर्ल्स पाहिजेत**
**ठाणे येथील एस. ए. इनामदार, या नामवंत रेडीमेड ब्लाऊज-च्या शोरूमसाठी अनुभवी सेल्सगर्ल पाहिजेत. (१०वी/१२वी पास) अर्जासह प्रत्यक्ष भेटा. पत्ता : चिंतामणी ज्वेलर्स शेजारी, जांभळी नाका, ठाणे. (प).**
**9930198166**

कॉटनग्रीनमध्ये प्रिंटींग प्रेसकरिता ४ कलर मशीन प्रोडक्शन सुपरवायझर, पंचींग ऑपरेटर आणि हेल्पर पाहिजेत. राहण्याची सोय. संपर्कः **7977798755** {NC254331}

पाहिजेत Ladies/ Gents, पार्ट/फुलटाईम, आउटडोर, clerk, कांदिवलीला- **9833502333 / 9833884920** {NC254441}

प्रिंटिंग प्रेससाठी पाहिजे. कल्याण वेस्ट सेंट्रल लाईनला राहणारे १) हॅडलबर्ग ऑफसेट (SM74- AUTOPLATE) प्रिंटर आणि बॉयलर, २) पंचिंग ऑपरेटर, ३) स्क्रीन प्रिंटर, ४) हेल्पर. फोकस, गाला नं. सी-१, रवारीया इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, कोणगाव, कल्याण वेस्ट. **7045333202 / 9821434502.** {NC254433}

प्रिन्टींग प्रेसमध्ये cutting मशीन operator आणि punching मशीन operator पाहिजे (भायखळा) - **9820080776 / 9819551478** {NC254437}

**रेल्वे स्टेशनजवळ आमच्या ऑफिससाठी ऑफिस बॉय पाहिजेत हाऊसकीपिंग आणि ऑफिसच्या कामाकरीता. भेटाः सकाळी 11 ते 6 पर्यंत, 1304B, नमन मिडटाऊन, सेनापति बापट मार्ग, इंडियाबुल्स फाइनेंसचा बाजूला, प्रभादेवी (पश्चिम). {NC254440}**

फ्रेशर्स पाहिजेत डेटा ॲनालिस्ट पदासाठी, कॉमर्स ग्रॅज्युएट, वर्क फ्रॉम होम, १५०००/- महिना पगार मुंबई आणि उपनगर इच्छुकांसाठी- jobs@informistdata.com {NC254438}

प्रसिद्ध जयलक्ष्मी कॉम्प्युटर टायपिंग इन्स्टीट्युट, भोईवाडा, परेलयेथे, नेहमी सकाळी नियमितपणे इन्स्टीट्युट उघडण्याकरिता व किरकोळ कामे करण्याकरिता (साफसफाई नाही). सुशिक्षित पुरुष मदतनीस पाहिजे. वयोमर्यादा ३० ते ६० वर्षापर्यंत, कामाची वेळ नियमित सकाळी ७ ते ११ जवळपास राहणाऱ्यांना विशेष प्राधान्य. संपर्क- श्री.रमेश पालव- **7738472068** {NC254435}

बोरिवली (वेस्ट), दवाखान्यामध्ये, जेन्टस कंपाऊंडर, पार्ट टाइम, (संध्याकाळी ७ ते १०), पाहिजेत. **9821279408** {NC254436}

## पाहिजेत

झवेरी बाजारमध्ये एकाउन्ट TALLY साठी मुलगा- मुलगी पाहिजेत.**-9702973241.** {NC254439}

हेडलबर्ग SM-74 फोरकलर ऑटोप्लेट ऑफसेट मशीनसाठी फिडरमन, बॉयलर आणि बाईंडर पाहिजेत. अंधेरी (पूर्व) साकीनाका संपर्क- **9820136761** {NC254432}

टेलीकॉलर (Sales) आणि अकाऊंटंट (Tally operator) कुर्ला ऑफिसमध्ये पाहिजेत- **9987592063** {NC254431}

नामांकीत कुरीयर कंपनीला घाटकोपरसाठी पार्ट टाईम डिलीव्हरी बॉय पाहिजेत. तसेच ऑफीस कामासाठी फुल टाईम लेडीज स्टाफ पाहिजेत. संपर्क कराः **9004567544**{NC254428}

Mahalaxmi स्टेशन जवळ दुकानमध्ये संध्याकाळी 5.00 ते 10.30 वेळेत कामासाठी मुले, रिटायर व्यक्ति पाहिजे Packing करिता पार्ट टाईम संध्याकाळी 5 ते 9 साठी मुले, मुली पाहिजेत. Mobile **9137833763.** {NC254429}

मस्जिद बंदर आणि मरीन लाईन्स येथे गिफ्ट आर्टिकलच्या शोरूममध्ये कामासाठी अनुभवी/ बिनअनुभवी मुले/मुली पाहिजेत. **9920938966.** {NC254458}

दादर, शिवाजीपार्क येथील नामांकित रेस्टॉरन्ट व डिलीव्हरी किचनसाठी वेटर, सफाई कामगार, युटिलिटी स्टाफ तसेच टू व्हिलर/ सायकल चालविणारे मराठी/हिन्दी भाषा जाणणारे फूड डिलीव्हरी बॉईज पाहिजेत. आकर्षक पगार. संपर्कः **8108415362/ 9167278027** {NC254454}

निवृत्त , VRS आणि गृहिणींसाठी उत्पन्नाची अतिरिक्त संधी उपलब्ध. संपर्क **:9653681991** {NC254451}

हेल्पर, इलेक्ट्रॉनिक्स टेक्निशियन आणि पीसीबी सोल्डरिंगसाठी मुले-मुली पाहिजेत. भेटा एलई इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि., २०१, रिचा ट्रेड सेन्टर, सातिवली रोड, वालिव फाटा, सुमन स्टीलच्यावरती, वसई (पूर्व), ४०१२०८. फोनः **9920848704** {NC254452}

त्वरित भरती सिक्युरिटी गार्ड- 8 तास ड्युटी,कल्याण पूर्व, चक्कीनाका, ठाणे कळवासाठी - **9220668889** {NC254453}

बॅक जॉबसाठी मुला, मुलींची भरती. पगार 18800/- ते 35500/- **9021058575** {NC254455}

सरकारमान्य कंपनीत भरती. वय ४०+/ १२वी पास (रिटायर लोकांना प्राधान्य). **9137630833** {NC254456}

सोल्डरींगच्या डिप्लोमा होल्डर सुपरवाईजर टेक्निशियन स्टाफकडून काम घेणे सर्कीट टेस्टींग आणि फोल्ट फाईडींगचा अनुभवी माणुस पाहिजे अंधेरी (पुर्व) मेहुल- **9821367555** {NC250124}

श्री गजानन महाराज मंदिर (माहीम) पूर्णवेळ/अर्धवेळ पुजारी नेमणे आहेत. संपर्क- **9372066697/ 9833591040** (सकाळी 10 ते 12/ संध्याकाळी 5 ते 7.30) {NC254450}

मरीनलाईन्सला अनुभवी पेस्टकंट्रोल ऑपरेटर्स पाहिजेत. पगार- 17000/- फोन- **9869110510/ 9820875253** {NC254442}

## पाहिजेत

डिलीव्हरी बॉय/ बायकर्स- पार्ट/ फुलटाईम DTDC कुरीयर शॉप १/२, शिंदे निवास कार्टररोड नंबर ६, बोरीवली ईस्ट **9323766047/ 8451015519** {NC254443}

माटुंगा (सेंट्रल) स्टेशनजवळ इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी लेडीज स्टाफ पाहिजे. संपर्क **9224411434** {NC254444}

**पाहिजेत**
**किंगसर्कल येथील सुप्रसिध्द हॉस्पिटल करीता आया/ वॉर्डबॉय/ हाऊसकिपर यांची भरती सुरू आहे.**
६ महिन्याचे अनुभवी अथवा फ्रेशर चालेल.
नोकरीसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.
मुलाखतीकरिता दिनांक ७ मार्च ते १४ मार्च पर्यंत आपला बायोडाटा, ६ फोटो, बँकेच्या पास बुकची कॉपी, आधारकार्ड, पॅनकार्ड, रेशन कार्ड किंवा ॲग्रीमेंट कॉपी, स्कूल लिव्हींग सर्टिफिकेट झेरॉक्स व ओरिजनलसह संपर्क साधा-
**PNS Upkeep Services Pvt Ltd**
**२०२, साई चेंबर्स, दुसरा मजला, सांताक्रुझ रेल्वे स्टेशन समोर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००५५**
**रेम्या- 8454893520**
**वनिता- 9702714966**
**ऑफिस- 9833276163**

शिवडी पूर्वमधील प्रिंटिंग प्रेसमध्ये काम करण्यासाठी हेल्पर पाहिजे. त्वरित संपर्क करा- **9082517355** {NC254445}

शिवडीमध्ये हेडलबर्ग SORMZ टू कलर प्रिंटींग मशीनकरीता अनुभवी फिडरमन पाहिजेत. त्वरित संपर्क करा- **9082517355** {NC254446}

चर्नीरोड व जोगेश्वरी औषधी कंपनीसाठी मुले पाहिजे, वयोमर्यादा १८ ते २५ संपर्क- महेश शिंदे **9152222356** {NC254447}

लोअर परेल येथील कंपनीमध्ये ऑफीस कामासाठी मुलगा (प्युन). दादर ते लोअर परेलजवळ राहणाऱ्यांना प्राधान्य. भेटाः किरण मेटल कॉर्पोरेशन, 229-A, दुसरा मजला, केवळ इंडस्ट्रिअल इस्टेट, लोअर परेल (प) मुंबई 400013 {NC254448}

## Situation Vacant

SOLDERING / ELECTRONICS TECHNICIAN JOGESHWARI EAST. MALE/ FEMALE ALFA ECO TECHNOLOGIES LLP. **8356023573** www.alfatechno.net {NC254343}

**REQUIRED PEON/ OFFICE BOY AT PRABHADEVI MINIMUM 10TH STANDARD, MUST BE ABLE TO SPEAK ENGLISH AND MARATHI. 9167308260 / 022-35728341**{NC254386}

Reqd Tally operator with accounting knowledge at our Malad West Office. Call : **9820080461** {NC254403}

## Situation Vacant

FRESHER / EXPERIENCED BEAUTICIAN URGENTLY REQUIRED AT LADIES SALON, LOKHANDWALA KANDIVALI (EAST). CALL **9167598525** {NC254426}

For Vadpe - Bhiwandi A Pvt Ltd co Needs Following Positions 1) Graduate in Commerce with 3-5 years experience For Senior Accounts. 2) Computer Operator - Office Admin Role Call Darshana **9920517298** {NC254418}

Company at Bhandup Requires Experienced Female Accountant, Tally knowledge. Contact : **9920934789.** {NC254427}

Required Office boys girls and outdoor sales field executive in collection agents Goregaon West **9870098733** {NC254430}

WANTED B.Sc. CHEMISTRY OR 12th PASS WITH SCIENCE SUBJECTS FOR LAB AT BORIVALI CONTACT **9870550891/ 9821322833** {NC254434}

Required part time at 5 to 9 pm office assistant male/female cum typist, basic computer knowledge must and one office boy at Sion Jain Society. Call/what's up on **9769600436** {NC254449}

## गुंतवणूक विषयक

फक्त ६ महिन्यात कर्ज कमी करणारे जीवनविमा गुंतवणूक साक्षरता अभियान- **9373956687/ 9326367944** {NC254009}

## कर्जविषयक

बँका, पतसंस्था, क्रेडिट कार्ड ऑनलाईन, खाजगी सावकार, वाहन, फायनान्सच्या गृहकर्जाची जप्ती नोटिसीच्या थकीत कर्जदारांना कायदेशीर सुटकेतून कर्जमुक्ती. संपर्कः **9326170655.** {NC254002}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा ३०००/- कमवा अनिरुद्धा दादर- **9967437950/ 8652643434** {NC254457}

## मेडिकल

घरी बसूनः 'वजन' कमी करा विविध फायद्यासोबत... (Lose your 'Weight' from Home with Various Benefits...) माहितीसाठी संपर्क- 'हरिश'- **9427516111** {NC254459}

## प्रॉपर्टीविषयक

**भव्य घरकुल योजना, मंगलमूर्ती अपार्टमेंट G+5 एरिया 550-25,00,000/-, बुकींग- 1,00,000/- 80% कर्ज. नालासोपारा पश्चिम. 9870316444** {NC254388}

## वधु वर मेळावा

वधु-वर सुचक केन्द्र, सर्व जाती मेळावा, शिबीर, कल्याण- **9869868620** {NC254297}

# समुद्रात अडकलेल्या रशियन तेलाची खरेदी करा

पान १ वरून

अमेरिकेच्या ट्रेझरी विभागाने भारतीय रिफायनरींना रशियन तेल खरेदी करण्यासाठी तात्पुरती ३० दिवसांची सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. ही जाणीवपूर्वक अल्पकालीन उपाययोजना असून, त्यामुळे रशियन सरकारला मोठा आर्थिक फायदा होणार नाही. कारण या परवानगीमध्ये फक्त समुद्रात अडकलेल्या म्हणजे वाहतुकीत असलेल्या तेलाशी संबंधित व्यवहारांना मंजुरी देण्यात आली आहे. भारत हा अमेरिकेचा अत्यंत महत्त्वाचा भागीदार आहे आणि नवी दिल्ली अमेरिकेकडून तेल खरेदी वाढवेल, अशी आम्हाला पूर्ण अपेक्षा आहे. हा तात्पुरता उपाय आहे. इराणने जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याने जो ताण निर्माण झाला आहे तो कमी करण्यास मदत होईल.

जे रशियन तेल अमेरिकेच्या नव्या निर्बंधांची अंमलबजावणी होण्यापूर्वीच जहाजात चढवण्यात आले होते त्यांना ही सवलत लागू होईल. अमेरिकेने निर्बंध कडक केल्यावर या तेलाला खरेदीदार मिळाला नाही आणि तो समुद्रातच अडकून राहिला. अधिकाऱ्यांच्या मते, या उपायामुळे त्या मालाची उतराई करून तो भारताला मर्यादित कालावधीत विकता येईल आणि त्यामुळे जागतिक ऊर्जा बाजारावर आणखी ताण येणार नाही.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करताना म्हटले की, भारताची परराष्ट्रनीती ही समझोता केलेल्या व्यक्तीच्या शोषणावर आधारित आहे. राहुल गांधी यांनी आज 'एक्स' वर पोस्ट करत टीका केली की, भारताची परराष्ट्रनीती देशातील जनतेच्या इच्छेनुसार असायला हवी. आज आपण जे पाहत आहोत ते परराष्ट्र धोरण नाही. ते एका समझोता केलेल्या व्यक्तीच्या शोषणाचा परिणाम आहे. राहुल गांधी यांनी ११ फेब्रुवारी रोजी लोकसभेत बजेटवरील चर्चेदरम्यान केलेले भाषणही शेअर केले. त्या भाषणात त्यांनी भारताच्या ऊर्जा सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली होती. आपण कोणाकडून तेल खरेदी करू शकतो किंवा करू शकत नाही, हे अमेरिका ठरवेल. आपले पंतप्रधान ते ठरवणार नाहीत, असे राहुल गांधी म्हणाले.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही स्वतंत्र पोस्ट करत मोदी सरकारवर टीका केली. त्यांच्या मते, एपस्टीन फाईल आणि अदानी प्रकरणामुळे पंतप्रधान मोदी यांना ब्लॅकमेल केले जात असल्याने भारताची धोरणात्मक स्वायत्तता आणि राष्ट्रीय सार्वभौमत्व धोक्यात आले आहे. अमेरिकेने भारताला रशियन तेल खरेदी करण्यासाठी '३० दिवसांची तात्पुरती सवलत' देत 'परवानगी' दिली. मोदी सरकार सतत आपली राजनैतिक भूमिका कमी करत आहे. अशा प्रकारची भाषा सहसा निर्बंध लादलेल्या देशांसाठी वापरली जाते. भारतासारख्या जबाबदार आणि जागतिक व्यवस्थेतील समान भागीदार देशासाठी नाही. व्यापार असो, तेल असो, डेटा असो किंवा मित्रदेशांशी दीर्घकालीन संबंध-मोदीजींनी सर्व काही शरणागती पत्करून सोडले. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी ते अटल बिहारी वाजपेयी कोणत्याही पंतप्रधानांनी परकीय दबावापुढे झुकून भारताला दुय्यम स्थानावर नेले नव्हते. 'मैं देश नहीं झुकने दूंगा' हा फक्त निवडणुका जिंकण्यासाठी घोषणा होती. १४० कोटी भारतीयांची फसवणूक झाली आहे, असा आरोपही त्यांनी केला.

### अमेरिकेचा दररोज ८,००० कोटींचा खर्च

इस्रायल-इराण युद्धाच्या सातव्या दिवशी आज दोन्ही बाजूंनी धुमश्चक्री सुरू राहिली. इराणने कुवेत-बहारीन आणि संयुक्त अरब अमिरातीतील अमेरिकन तळांवर जोरदार हल्ले केले. यात इरबिलसह २० तळांचे मोठे नुकसान झाले. बहारीनमधील एका तेल रिफायनरीवरही हल्ला केला. इराणी सैन्याने दोन ड्रोनही पाडले आहेत. एक अमेरिकन एमक्यू-९ ड्रोन होता आणि दुसरा इस्रायली हर्मीस-९०० ड्रोन होता. इराण सीमेपासून ३४० किमीवर असलेल्या अमेरिकेच्या अब्राहन लिंकन युद्धनौकेलाही लक्ष्य केले. इस्त्रायलने इराणची ३०० क्षेपणास्त्र नष्ट केली. तेहरानच्या शासकीय इमारतींवरही हल्ला केला. इराणमध्ये अनेक ठिकाणी पाणी आणि वीजपुरवठा खंडित झाला. अमेरिका-इस्त्रायलच्या हल्ल्यांमध्ये इराणमध्ये १,३०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. एका आकडेवारीनुसार इराण युद्धाच्या पहिल्या १०० तासांत अमेरिकेने अंदाजे ३.७ अब्ज डॉलर्स (३३,००० कोटी रुपये) खर्च केले आहेत. अमेरिका या युद्धासाठी दररोज अंदाजे ८९१ दशलक्ष डॉलर्स (८,००० कोटी रुपये) खर्च करत आहे.

# कर्नाटकात १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडियावर बंदी

बंगळुरू

**कर्नाटकचे** मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी राज्याचा अर्थसंकल्प सादर करत असताना १६ वर्षांखालील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदीची घोषणा केली. या बंदीची अंमलबजावणी लवकरच होणार असून असा निर्णय घेणारे सिद्धरामय्या भारतातील पहिले मुख्यमंत्री ठरले आहेत. ते म्हणाले की, मुलांमध्ये मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर वेगाने वाढत आहे, ज्यामुळे त्यांच्यावर चुकीचा परिणाम होत आहे. हा दुष्परिणाम कमी करण्यासाठी सरकारकडून १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात येत आहे. या बंदीची अंमलबजावणी कशी केली जाईल, याची तयारी सुरू आहे आणि लवकरच नियम बनवले जातील.

# अवयव प्रत्यारोपण २२ लाखांची मदत

**मुंबई- राज्यातील** गंभीर आजारांवरील उपचारांसाठी दिलासा देणारा निर्णय घेत अवयव प्रत्यारोपणासाठी आता २२ लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत देण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत उपलब्ध उपचारांची संख्या १,३५६ वरून २,३९९ इतकी वाढवण्यात आली आहे. तसेच या योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांची संख्या १,७९२ वरून ४,५३२ इतकी करण्यात आली आहे. याशिवाय या योजनेंतर्गत जास्त खर्च होणाऱ्या नऊ प्रकारच्या अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारांसाठी राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या निधीतून २२ लाख रुपयांपर्यंतची मदत देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# आजचे राशी भविष्य

शनिवार ता. ७ मार्च २०२६
ज्योतिष पंडीत प्रज्ञा धनंजय

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | इच्छापूर्तीचा दिवस आहे. नोकरीत चमकदार कामगिरी होईल. सहकाऱ्यांची चांगली साथ लाभेल. वरिष्ठांकडून प्रशंसा होईल. |
| वृषभ | संयमाची परीक्षा बघणारा दिवस आहे. प्रियजनांबरोबर गैरसमजातून खटके उडण्याचा संभव आहे. वड्याचे तेल वांग्यावर काढणे टाळा. |
| मिथुन | घरी पाहुण्यारावळ्यांची सरबराई करण्यात आजचा दिवस जाण्याची शक्यता आहे. मित्रमंडळींच्या भेटीगाठी होतील. कामे त्वरेने पार पाडता येतील. |
| कर्क | आर्थिक लाभाचा दिवस आहे. झटपट पैसा मिळण्याचे योग आहेत. जोडीदाराबरोबर सहलीचा आनंद घेता येईल. |
| सिंह | आक्रमक वृत्ती आज काबूत ठेवणेच योग्य ठरेल. सगळीच कामे पूर्ण होतील असे नाही, याचे भान ठेवा. पचनाबाबत तक्रारी संभवतात. तेलकट खाणे टाळा. |
| कन्या | उद्दिष्टपूर्तीसाठी कठोर मेहनत घ्यावी लागेल. जोडीदाराशी बोलताना रागावर ताबा ठेवा. सहकाऱ्यांशी वाद टाळा. |
| तूळ | मनोरंजनाकडे कल राहील. मात्र त्यातून उत्साह वाढेल. कामाच्या ठिकाणी व्यावसायिक दृष्टीकोन ठेवणे हिताचे ठरेल. |
| वृश्चिक | कठोर परिश्रमाचे चांगले परिणाम मिळतील. हितचिंतक आणि मित्रपरिवाराचा पाठिंबा लाभेल. झटपट पैसा मिळण्याचे योग आहेत. |
| धनु | अर्थप्राप्ती चांगली होईल. दानधर्मासाठी पैसा खर्च होईल. कामानिमित्त प्रवासाचे योग आहेत. त्यातून फायदा होईल. |
| मकर | तुमचे निर्णय योग्य ठरतील. आर्थिक गुंतवणुकीस अनुकूलता आहे. चिंतामुक्त दिवस राहील. |
| कुंभ | नकारार्थी विचारांना मनात थारा देऊ नका. मौल्यवान वस्तू सांभाळा. आज कामे वेळेत पूर्ण होण्याची शक्यता नाही. |
| मीन | दिवस चांगला असला तरी अडचणी आणि चिंता यामुळे त्याचा उपभोग घेता येणार नाही. हाती येणारा पैसा अटळपणे खर्चही होईल. कामाची दखल घेतली न गेल्याचे असमाधान राहील. |

-: वाचकांना सूचना - दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.-मॅनेजर, 'नवाकाळ'

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री — राजलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 10 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 06/03/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SR-03 : 7224**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1052 (श्री एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 1475 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 2206 (पवार लॉटरी, ठाणे) | 2431 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 4697 | 6807 | 6842 | 8414 | 8840 | 9988 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0031 | 2169 | 2847 | 3123 | 3640 | 4165 | 5233 | 6272 | 7888 | 9370 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0687 | 2751 | 5574 | 5918 | 5948 | 6652 | 7130 | 7954 | 8076 | 8276 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस | 1146 | 1870 | 2870 | 3814 | 5163 | 6139 | 7254 | 8508 |
| रु. 300/- | 1155 | 1963 | 2876 | 3836 | 5280 | 6166 | 7347 | 8751 |
| 0000 | 1166 | 2056 | 3043 | 3929 | 5311 | 6268 | 7471 | 8824 |
| 0025 | 1171 | 2126 | 3154 | 4048 | 5465 | 6314 | 7537 | 9070 |
| 0058 | 1260 | 2128 | 3158 | 4197 | 5549 | 6365 | 7712 | 9184 |
| 0205 | 1327 | 2192 | 3231 | 4224 | 5559 | 6473 | 7716 | 9193 |
| 0304 | 1422 | 2269 | 3297 | 4281 | 5573 | 6613 | 7770 | 9276 |
| 0340 | 1461 | 2276 | 3334 | 4292 | 5661 | 6619 | 7803 | 9294 |
| 0500 | 1569 | 2280 | 3376 | 4349 | 5768 | 6663 | 7861 | 9314 |
| 0710 | 1570 | 2328 | 3388 | 4437 | 5835 | 6820 | 8083 | 9550 |
| 0818 | 1601 | 2412 | 3416 | 4494 | 6082 | 6886 | 8169 | 9659 |
| 0882 | 1719 | 2542 | 3470 | 4569 | 6087 | 7127 | 8196 | 9777 |
| 1076 | 1845 | 2587 | 3537 | 4693 | 6097 | 7228 | 8486 | 9969 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. ७/३/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | २ | ७ |
| १२ | २१ | ७१ |
| १७ | २६ | ७६ |
| २९० | १३८ | १६० |
| २३६ | २३७ | ३६८ |

## महाराष्ट्र वैभवलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर शुक्रवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 10 • सोडत दिनांक 06/03/2026

| बक्षिस | क्रमांक | एजन्सी |
|---|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | VL-04 : 7847 | अंबिका एजन्सी - दादर, मुंबई (प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत) |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 7847 | श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3137 | श्री गुरुदेव दत्त लॉटरी एजन्सी - पुणे |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1712 | 3114 | 3936 | 4024 | 5826 | 7131 | 7960 | 9102 | 9658 | 9860 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0029 | 0687 | 2795 | 3305 | 3442 | 4606 | 7488 | 8915 | 9123 | 9683 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1011 | 2524 | 3350 | 3570 | 3971 | 4753 | 5503 | 7417 | 7941 | 7948 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0302 | 1771 | 2093 | 2140 | 3284 | 4222 | 5390 | 5956 | 6814 | 8509 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस | | 1253 | 2162 | 2839 | 3588 | 4305 | 4830 | 5659 | 6398 | 6962 | 7978 | 8538 | 9249 |
| रु.100/- | | 1254 | 2164 | 2857 | 3608 | 4329 | 4841 | 5674 | 6407 | 6963 | 7997 | 8552 | 9320 |
| (सर्व मालिकांसाठी) | | 1289 | 2208 | 2872 | 3666 | 4371 | 4847 | 5682 | 6416 | 6966 | 8003 | 8558 | 9342 |
| | | 1306 | 2217 | 2924 | 3672 | 4374 | 4854 | 5705 | 6455 | 7013 | 8017 | 8584 | 9348 |
| | | 1316 | 2224 | 2947 | 3690 | 4387 | 4873 | 5715 | 6460 | 7021 | 8021 | 8600 | 9375 |
| 0007 | 0580 | 1365 | 2228 | 3009 | 3712 | 4408 | 4924 | 5744 | 6471 | 7057 | 8024 | 8606 | 9399 |
| 0009 | 0598 | 1381 | 2235 | 3017 | 3713 | 4416 | 4945 | 5747 | 6473 | 7074 | 8026 | 8640 | 9417 |
| 0016 | 0687 | 1415 | 2246 | 3020 | 3735 | 4424 | 4949 | 5754 | 6485 | 7075 | 8086 | 8684 | 9427 |
| 0038 | 0730 | 1471 | 2253 | 3025 | 3739 | 4441 | 4994 | 5755 | 6498 | 7087 | 8134 | 8774 | 9498 |
| 0048 | 0740 | 1481 | 2261 | 3043 | 3749 | 4443 | 5038 | 5774 | 6502 | 7112 | 8151 | 8780 | 9500 |
| 0049 | 0758 | 1501 | 2269 | 3094 | 3752 | 4447 | 5055 | 5775 | 6533 | 7162 | 8178 | 8783 | 9504 |
| 0052 | 0770 | 1512 | 2275 | 3095 | 3767 | 4448 | 5058 | 5776 | 6540 | 7180 | 8181 | 8792 | 9521 |
| 0060 | 0800 | 1521 | 2280 | 3106 | 3794 | 4476 | 5059 | 5806 | 6567 | 7247 | 8198 | 8798 | 9531 |
| 0069 | 0801 | 1541 | 2283 | 3135 | 3800 | 4480 | 5089 | 5839 | 6568 | 7264 | 8218 | 8801 | 9554 |
| 0083 | 0804 | 1573 | 2295 | 3137 | 3839 | 4485 | 5098 | 5854 | 6569 | 7277 | 8254 | 8806 | 9561 |
| 0095 | 0874 | 1580 | 2323 | 3150 | 3869 | 4505 | 5109 | 5855 | 6603 | 7376 | 8273 | 8812 | 9579 |
| 0101 | 0880 | 1581 | 2364 | 3166 | 3896 | 4524 | 5138 | 5858 | 6630 | 7380 | 8274 | 8818 | 9583 |
| 0108 | 0903 | 1608 | 2393 | 3182 | 3913 | 4530 | 5191 | 5871 | 6639 | 7397 | 8288 | 8827 | 9624 |
| 0131 | 0939 | 1612 | 2414 | 3213 | 3915 | 4534 | 5195 | 5953 | 6643 | 7410 | 8328 | 8833 | 9626 |
| 0203 | 0961 | 1652 | 2419 | 3258 | 3930 | 4542 | 5198 | 5959 | 6648 | 7421 | 8345 | 8834 | 9680 |
| 0204 | 1013 | 1680 | 2422 | 3275 | 3934 | 4564 | 5204 | 6002 | 6650 | 7493 | 8354 | 8840 | 9693 |
| 0238 | 1031 | 1710 | 2430 | 3279 | 3951 | 4569 | 5255 | 6006 | 6669 | 7573 | 8368 | 8861 | 9697 |
| 0254 | 1050 | 1732 | 2481 | 3303 | 4002 | 4578 | 5302 | 6015 | 6672 | 7639 | 8370 | 8887 | 9709 |
| 0255 | 1079 | 1745 | 2482 | 3314 | 4034 | 4588 | 5321 | 6026 | 6683 | 7643 | 8381 | 8903 | 9733 |
| 0317 | 1094 | 1760 | 2496 | 3324 | 4045 | 4590 | 5339 | 6044 | 6688 | 7708 | 8382 | 8908 | 9744 |
| 0322 | 1110 | 1816 | 2529 | 3334 | 4087 | 4594 | 5359 | 6049 | 6691 | 7718 | 8385 | 8918 | 9798 |
| 0333 | 1111 | 1817 | 2540 | 3339 | 4113 | 4595 | 5366 | 6086 | 6692 | 7721 | 8388 | 8919 | 9803 |
| 0373 | 1116 | 1913 | 2549 | 3342 | 4118 | 4603 | 5385 | 6092 | 6708 | 7727 | 8392 | 8930 | 9817 |
| 0391 | 1131 | 1914 | 2562 | 3373 | 4122 | 4641 | 5428 | 6106 | 6726 | 7737 | 8408 | 8942 | 9839 |
| 0406 | 1136 | 1916 | 2608 | 3374 | 4142 | 4644 | 5478 | 6115 | 6727 | 7747 | 8411 | 8980 | 9841 |
| 0440 | 1148 | 1921 | 2625 | 3376 | 4146 | 4663 | 5490 | 6129 | 6748 | 7761 | 8418 | 9048 | 9940 |
| 0445 | 1160 | 1952 | 2666 | 3384 | 4147 | 4693 | 5494 | 6151 | 6749 | 7780 | 8420 | 9062 | 9946 |
| 0450 | 1161 | 1962 | 2672 | 3404 | 4174 | 4695 | 5505 | 6163 | 6773 | 7783 | 8435 | 9099 | 9949 |
| 0452 | 1174 | 1972 | 2702 | 3445 | 4184 | 4713 | 5521 | 6186 | 6789 | 7790 | 8449 | 9103 | 9975 |
| 0468 | 1182 | 2001 | 2739 | 3453 | 4236 | 4727 | 5550 | 6230 | 6815 | 7846 | 8468 | 9105 | 9976 |
| 0486 | 1188 | 2007 | 2742 | 3486 | 4241 | 4737 | 5570 | 6247 | 6847 | 7855 | 8480 | 9123 | 9979 |
| 0502 | 1210 | 2044 | 2756 | 3535 | 4242 | 4759 | 5571 | 6255 | 6866 | 7875 | 8482 | 9151 | 9980 |
| 0503 | 1212 | 2049 | 2776 | 3538 | 4248 | 4788 | 5577 | 6259 | 6896 | 7908 | 8488 | 9173 | 9981 |
| 0505 | 1241 | 2114 | 2785 | 3574 | 4264 | 4800 | 5583 | 6354 | 6900 | 7937 | 8492 | 9197 | 9993 |
| 0552 | 1251 | 2116 | 2836 | 3582 | 4300 | 4823 | 5655 | 6390 | 6933 | 7965 | 8522 | 9231 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी धन विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 10 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 06/03/2026

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-00 : 4853**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : 5560
तिसरे बक्षिस रु. 2000/- : 5087

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 3738 | 4044 | 5619 | 5783 | 6550 | 7776 | 8332 | 8576 | 8796 | 9282 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 3033 | 3775 | 4207 | 4749 | 7055 | 7939 | 8479 | 9450 | 9520 | 9723 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1729 | 1789 | 2122 | 2637 | 3302 | 3758 | 3835 | 5037 | 9006 | 9131 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सातवे बक्षीस | | 1507 | 2322 | 3330 | 4234 | 5343 | 6357 | 7185 | 8087 | 9149 |
| रु.100/- | | 1514 | 2339 | 3336 | 4341 | 5355 | 6361 | 7198 | 8168 | 9170 |
| (सर्व मालिकांसाठी) | | 1520 | 2342 | 3372 | 4349 | 5451 | 6461 | 7375 | 8216 | 9287 |
| 0008 | 1016 | 1521 | 2380 | 3394 | 4364 | 5456 | 6469 | 7426 | 8428 | 9369 |
| 0016 | 1041 | 1531 | 2423 | 3438 | 4388 | 5496 | 6549 | 7470 | 8440 | 9390 |
| 0038 | 1086 | 1545 | 2588 | 3449 | 4404 | 5531 | 6600 | 7478 | 8441 | 9469 |
| 0068 | 1127 | 1797 | 2599 | 3546 | 4418 | 5532 | 6616 | 7487 | 8451 | 9472 |
| 0341 | 1129 | 1815 | 2624 | 3586 | 4430 | 5565 | 6618 | 7492 | 8494 | 9499 |
| 0347 | 1133 | 1855 | 2626 | 3793 | 4443 | 5579 | 6621 | 7516 | 8510 | 9551 |
| 0400 | 1171 | 2003 | 2628 | 3799 | 4477 | 5622 | 6653 | 7539 | 8528 | 9559 |
| 0438 | 1178 | 2016 | 2675 | 3818 | 4490 | 5696 | 6669 | 7632 | 8568 | 9569 |
| 0458 | 1186 | 2034 | 2704 | 3823 | 4501 | 5697 | 6683 | 7735 | 8661 | 9598 |
| 0508 | 1187 | 2083 | 2722 | 3838 | 4530 | 5726 | 6690 | 7743 | 8711 | 9607 |
| 0693 | 1223 | 2152 | 2730 | 3852 | 4649 | 5923 | 6694 | 7769 | 8827 | 9697 |
| 0702 | 1285 | 2202 | 2869 | 3857 | 5089 | 6058 | 6759 | 7772 | 8848 | 9726 |
| 0773 | 1355 | 2216 | 3037 | 3934 | 5118 | 6087 | 6870 | 7779 | 8881 | 9768 |
| 0784 | 1379 | 2244 | 3079 | 3973 | 5150 | 6167 | 6942 | 7786 | 8885 | 9791 |
| 0810 | 1380 | 2248 | 3176 | 4041 | 5205 | 6245 | 6964 | 7877 | 9083 | 9911 |
| 0817 | 1414 | 2256 | 3211 | 4131 | 5250 | 6284 | 7021 | 8013 | 9093 | 9940 |
| 0824 | 1416 | 2266 | 3272 | 4165 | 5295 | 6336 | 7098 | 8077 | 9118 | 9966 |
| 0876 | 1478 | 2312 | 3315 | 4231 | 5326 | 6345 | 7183 | 8086 | 9124 | 9973 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी शुक्र विकली लॉटरी

सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर शुक्रवार • सोडत क्रमांक 10 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 06/03/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-04 : 3466**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3495 | 5896 (महावीर लॉटरी सेंटर - कोल्हापूर) | 6369 (डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली) | 7103 | 7298 | 8608 | 8662 | 9110 | 9456 | 9486 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0111 | 1912 | 3592 | 4455 | 5263 | 5603 | 6326 | 8326 | 8399 | 9352 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1525 | 2597 | 2699 | 5786 | 6232 | 6521 | 6536 | 6639 | 6743 | 7944 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0410 | 0598 | 0837 | 1726 | 2795 | 4085 | 5165 | 5196 | 8465 | 8761 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सहावे बक्षिस | | 1394 | 2223 | 2947 | 3421 | 4419 | 5494 | 6460 | 7483 | 8086 | 8955 |
| रु. 100/- | | 1403 | 2234 | 2962 | 3474 | 4468 | 5495 | 6487 | 7507 | 8181 | 8973 |
| 0004 | 0802 | 1420 | 2236 | 3013 | 3502 | 4515 | 5503 | 6488 | 7522 | 8203 | 8980 |
| 0026 | 0913 | 1452 | 2253 | 3024 | 3523 | 4533 | 5504 | 6503 | 7577 | 8287 | 9014 |
| 0030 | 0914 | 1460 | 2263 | 3081 | 3600 | 4544 | 5511 | 6527 | 7682 | 8451 | 9035 |
| 0100 | 0939 | 1471 | 2269 | 3132 | 3604 | 4559 | 5549 | 6563 | 7695 | 8458 | 9036 |
| 0109 | 0991 | 1610 | 2326 | 3135 | 3661 | 4685 | 5586 | 6606 | 7707 | 8475 | 9096 |
| 0207 | 1020 | 1638 | 2374 | 3165 | 3665 | 4723 | 5764 | 6630 | 7713 | 8488 | 9241 |
| 0218 | 1061 | 1646 | 2379 | 3197 | 3778 | 4745 | 5770 | 6684 | 7714 | 8506 | 9336 |
| 0307 | 1070 | 1647 | 2387 | 3243 | 3782 | 4812 | 5773 | 6766 | 7732 | 8571 | 9407 |
| 0343 | 1074 | 1712 | 2426 | 3313 | 3853 | 4886 | 5836 | 6870 | 7742 | 8597 | 9493 |
| 0368 | 1110 | 1726 | 2554 | 3316 | 3866 | 4928 | 5885 | 6879 | 7761 | 8638 | 9498 |
| 0370 | 1119 | 1803 | 2576 | 3330 | 3933 | 4962 | 5916 | 6928 | 7803 | 8670 | 9559 |
| 0397 | 1133 | 1814 | 2626 | 3336 | 3935 | 5039 | 6046 | 6982 | 7830 | 8702 | 9737 |
| 0400 | 1153 | 1899 | 2681 | 3338 | 4007 | 5091 | 6048 | 6999 | 7857 | 8787 | 9772 |
| 0423 | 1159 | 1913 | 2692 | 3344 | 4021 | 5215 | 6103 | 7067 | 7869 | 8838 | 9782 |
| 0443 | 1170 | 1917 | 2727 | 3363 | 4164 | 5254 | 6123 | 7136 | 7879 | 8871 | 9831 |
| 0536 | 1252 | 2066 | 2731 | 3369 | 4256 | 5257 | 6263 | 7149 | 7926 | 8873 | 9865 |
| 0600 | 1261 | 2101 | 2764 | 3375 | 4334 | 5289 | 6286 | 7164 | 7931 | 8874 | 9889 |
| 0602 | 1340 | 2134 | 2791 | 3380 | 4344 | 5311 | 6289 | 7170 | 7974 | 8875 | 9903 |
| 0709 | 1344 | 2201 | 2839 | 3398 | 4365 | 5322 | 6296 | 7251 | 8006 | 8880 | 9959 |
| 0730 | 1391 | 2202 | 2890 | 3399 | 4404 | 5393 | 6459 | 7335 | 8075 | 8888 | 9993 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी




# WE CARE

## सुसंगत, समृद्ध आणि सामायिक भविष्यासाठी

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, हा भारतातील सर्वाधिक मोठा खाजगी उद्योगसमुह असून, त्याद्वारे रोज लाखो लोकांच्या जीवनाला स्पर्श केला जातो.

नवीन ऊर्जा, शुद्धीकरण आणि विपणन, पेट्रोकेमिकल्स, अन्वेषण आणि उत्पादन, किरकोळ विक्री, डिजिटल सेवा आणि मीडिया आणि मनोरंजन यासारख्या व्यवसायांसह, शाश्वत आणि समावेशक विकास साधून रिलायन्स भारताच्या अर्थव्यवस्थेत आघाडीवर आहे.

रिलायन्स ने २०२४ मध्ये टाइम्सच्या १०० सर्वाधिक प्रभावशाली कंपन्यांमध्ये स्थान मिळविले आहे. तसेच फोर्ब्स ग्लोबल २०००® च्या यादीत ४५व्या क्रमांकावर आहे आणि २०२५ साठी फोर्च्युन ग्लोबल ५००® च्या यादीत ८८वे स्थान मिळविले आहे.

जिने ८.७ कोटींहून अधिक लोकांच्या जीवनाला स्पर्श केला आहे अशी भारतातील सर्वात मोठी कॉर्पोरेट धर्मादाय संस्था 'रिलायन्स फाऊंडेशन'सह, आम्ही रिलायन्समध्ये जे काही केले आहे त्यात काळजी आणि करुणेची भावना हा एक समान धागा आहे.

**कारण रिलायन्सची स्थापना झाली होती काळजी घेणारा उद्योग म्हणून, आणि तो तसाच राहील.**

Reliance
Industries Limited
Growth is Life

www.ril.com


गोकुळ
सशक्त रहा, आनंदी रहा...
गोकुळ दही, ताक, लस्सी, फ्लेवर्ड मिल्क
Gokul Lassi
गोकुळ सुमधूर लस्सी
Gokul Butter milk
गोकुळ ताक | छास
Gokul Dahi
CHOCOLATE FLAVOUR
STRAWBERRY FLAVOUR
PISTA FLAVOUR
VANILLA FLAVOUR
प्रिमियम गोकुळ Dahi
दैनिक "नवाकाळ" च्या १०४ व्या वर्धापनदिनास गोकुळ परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा !
कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर.
mktg@gokulmilk.coop www.gokulmilk.coop 0231 2672311 to 15
डॉ. योगेश गोडबोले कार्यकारी संचालक
सर्व संचालक
नविद हसन मुश्रीफ चेअरमन

# लाडक्या बहिणींची फसवणूक? २,१०० रुपये मिळणार नाहीत

पान १ वरून

आराखडा तयार केला जाईल, बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे, अजित पवारांच्या स्मृतीसाठी स्मारक उभारण्यात येईल.

**कृषी योजना**

शेतीमालाला जागतिक बाजारपेठ मिळवून दिली जाईल, शेतीचे उत्पन्न खर्च कमी करणार, नैसर्गिक शेतीखाली अधिक शेतजमीन आणली जाईल, मत्स्य व्यवसायासाठी विशेष योजना राबवली जाईल, पंतप्रधान ग्रामीण आवास योजनेत २७ लाखांपैकी ३ लाख घरे पूर्ण झाली आहेत, ग्रामसडक योजनेचा तिसरा टप्पा मंजूर केला आहे.

**उद्योग योजना**

महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत देशात अव्वल आहे. उद्योग वाढीसाठी प्रत्येक जिल्ह्यात सेवाक्षेत्र आयुक्तालय स्थापन केले जाईल. स्टील हब म्हणून उदयास आलेल्या गडचिरोलीत मोठी गुंतवणूक करून रस्ते विकास मोहीम हाती घेतली जातील. त्यासाठी २ लाख कोटींची गुंतवणूक करण्यात येईल.

**पर्यटन**

वासोटा किल्ला (सातारा) येथे रोप-वे प्रकल्प होईल. रामटेक येथे तिसरी चित्रनगरी उभारण्यात येईल. पाच ज्योतिर्लिंगांचा विकास वेगाने करण्यासाठी ज्येष्ठ अधिकाऱ्यांना जबाबदारी दिली आहे. तिसरी चित्रनगरी नागपूर जिल्ह्यात रामटेकमध्ये साकारली जाईल. मुंबई, दुबई, सिंगापूर येथे पर्यटन केंद्र सुरू केले जाईल.

## दुष्काळाचे संकट

२०२६ मध्ये अल निनोच्या प्रभावामुळे हवामान तज्ज्ञांनी दृष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. हे लक्षात घेऊन पिण्याचे पाणी राखून ठेवणे, जलयुक्त शिवार व जलसंधारण योजनेच्या माध्यमातून पाण्याच्या संवर्धनासाठी विविध उपाययोजना केल्या जाणार आहेत.

**दळणवळण योजना**

विरार, ठाणे, बोईसर स्थानकाभोवतीचा विकास केला जाईल. २०३० पर्यंत एमएमआर परिसराची अर्थव्यवस्था ३०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्यात येईल. एमएमआरमधील झोपड्यांना आळा घालण्याचे धोरण आणले जाईल. मुंबईत धारावी ते गेट वे दरम्यान दुसरा भुयारी मेट्रो मार्ग केला जाईल. ठाणे ते नवी मुंबई उन्नत मार्ग बांधला जाईल, छेडानगर ते आनंदनगर ते साकेत उन्नत मार्ग पूर्ण करून दक्षिण मुंबईला समृद्धी मार्गाला जोडला जाईल. पुण्याच्या मेट्रो-२ ला मान्यता देण्यात आली. मुंबईतील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून जलमार्ग वाढविण्यात येतील. राज्यात एकूण १,२०० किलोमीटरचे मेट्रोमार्ग आणि ६,००० किमीच्या द्रूतगती मार्ग तयार केले जातील. मुंबई ४९० किमीचे मेट्रो मार्ग होणार असून, त्यापैकी १७६ किमीच्या मेट्रोचे काम सुरू आहे.

**वाढवण बंदर महत्त्वाचे**

एक हजारहून जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना काँक्रीट रस्त्याने जोडले जाईल. शक्तिपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्याला मान्यता दिली आहे. अटल सेतू आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात तिसरी मुंबई तयार केली जाईल. तिची व्याप्ती रायगड जिल्ह्यातील पेणपर्यंत असेल. तर पालघर तालुक्यातील वाढवण येथे चौथी मुंबई तयार केली जाईल. या बंदराला समृध्दी महामार्गाला जोडले जाईल. वाढवण येथील मच्छिमारांसाठी सातपाटी येथे बंदर विकसित केले जाईल. वाढवण बंदराद्वारे १२ लाख रोजगार निर्मित होतील.

**बुलेट ट्रेनच्या स्थानकांचे काम वर्षभरात**

मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरील विरार, बोईसर व ठाणे या ३ स्थानकांचे काम फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण केले जाईल. मुंबईत २० लाख झोपडपट्टी घरांच्या पुनर्विकासासाठी आणि १० लाख परवडणारी घरे करण्यासाठी आराखडा करण्यात येणार आहे.

**३०० कोटी झाडे लावणार**

महाराष्ट्रातील हरित पट्टा वाढविण्यासाठी ३०० कोटी झाडे लावण्याची योजना हाती घेतली जाणार आहे. नदीजोड प्रकल्पांना निधी मंजूर करण्यात आला आहे.

**शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी**

३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजना सरकारने मंजूर केली आहे. जे नियमित कर्ज परतफेड करतात त्यांना ५० हजारपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येईल.

**स्टार्टअपना प्रोत्साहन**

मुख्यमंत्री योजनेअंतर्गत सरकार १ लाख २५ हजार उद्योजक घडवण्यासाठी स्टार्टअपना बळ देणार आहे. उद्योजकता केंद्र स्थापन करून यातील ५० सर्वोत्कृष्ट स्टार्टअपना निविदा न काढता सरकारतर्फे २५ लाखांपर्यंतची कामे दिली जातील.

**एकनाथ शिंदे खूश**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातील दरे या मूळगावी निसर्गोपचार केंद्र उभारले जाणार आहे.

**इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन**

नवे इलेक्ट्रिक वाहन खरेदी करताना मोटार वाहन करात ३० टक्के सूट दिली आहे. तर इतर गाड्यांवरील पर्यावरण करात दुप्पट वाढ केली आहे. यातून १६० कोटी उत्पन्न मिळेल.

### आज शब्दकोडे नाही

शब्दकोडे क्रमांक १५३९ आज प्रसिद्ध होऊ शकले नाही. हे शब्दकोडे आणि शब्दकोडे क्र. १५३८ चे उत्तर उद्या प्रसिद्ध होईल.




































# सावरकरांना भारतरत्न देण्याचा प्रस्ताव विधानसभेत मागे

**मुंबई** - स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न देण्याबाबत केंद्र सरकारकडे शिफारस करावी, असा ठराव भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत मांडला. मात्र हा अशासकीय ठराव अखेर मागे घेतला गेला. राज्य सरकारकडून अशा प्रकारची शिफारस करणे नियमबाह्य ठरेल, अशी भूमिका सरकारतर्फे मांडण्यात आल्यानंतर सुधीर मुनगंटीवार यांनी स्वंत व्यक्त करत ठराव मागे घेतला. मुनगंटीवार यांनी विधानसभा नियम १०६ अंतर्गत हा अशासकीय ठराव सभागृहात मांडला होता. स्वातंत्र्य लढ्यातील सावरकरांचे योगदान लक्षात घेता त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी या ठरावातून केली होती. या प्रस्तावाला सभागृहातील अनेक आमदारांनी पाठिंबा दर्शवला होता. मात्र या संदर्भात राज्य सरकारकडून स्पष्ट करण्यात आले की, भारतरत्न पुरस्कार देण्याचा निर्णय हा पूर्णपणे केंद्र सरकारच्या अधिकारक्षेत्रातील विषय आहे. त्यामुळे राज्य विधानसभेतून अशा प्रकारची शिफारस करणे नियमांनुसार योग्य ठरणार नाही. सरकारची ही भूमिका समोर आल्यानंतर मुनगंटीवार यांनी नाराजी व्यक्त करत ठराव मागे घेतला.

## जीटीबी नगरच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी त्रिपक्षीय करार

■ मुंबई

### खासगी जमिनीवरील म्हाडाचा पहिला प्रकल्प

**सायन** (कोळीवाडा) येथील जीटीबी नगरमधील सिंधी निर्वासितांच्या २५ धोकादायक इमारतींचा पुनर्विकास म्हाडामार्फत रुस्तमजी समूहाच्या किस्टोन रिॲलिटर्सच्या सहाय्याने होणार आहे. यासाठी त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. काल म्हाडा कार्यालयात झालेल्या या करारान्वये प्रकल्पातील १,२०० कुटुंबांना ६३५ चौरस फुटांची नवीन घरे, २० हजार रुपये मासिक भाडे आणि ५ वर्षांची देखभाल मिळणार आहे. हा त्रिपक्षीय विकास करार म्हाडा, विकासक आणि रहिवासी यांच्यासोबत म्हाडाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी म्हाडा मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर तसेच किस्टोन रिअलटर्स (रुस्तुमजी ग्रुप)चे व्यवस्थापकीय संचालक बोमन इराणी उपस्थित होते. सुमारे ११.२० एकर जागेवर पसरलेल्या या वसाहतीतील सिंधी निर्वासितांच्या २५ इमारतींमध्ये सुमारे १,२०० सदनिका होत्या. याशिवाय उर्वरित मोकळ्या जागांवर २०० झोपड्या होत्या.

## राज्यातील ५० बिबटे 'वनतारा'त पाठवणार

**मुंबई** - महाराष्ट्रातील वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील विविध रेस्क्यू सेंटर्समध्ये ठेवण्यात आलेले सुमारे ५० बिबटे गुजरातमधील जामनगर येथील वनतारा पुनर्वसन केंद्रात स्थलांतरित केले जाणार आहेत. या संदर्भात मंत्रालयात राज्याच्या वनविभाग आणि वनतारा प्रशासन यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत हा करार झाला आहे. मात्र, राज्यातील वन्यजीव गुजरातला हलवण्याच्या निर्णयावरून राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. विरोधकांकडून राज्यातील प्राणी बाहेर पाठवण्यावर प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा










